# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 08/09/2017

**प्रेस नोट**




## मागील वर्षाच्या तुलनेत गुन्हे शाबितीच्या प्रमाणात वाढ.

दि. 08.09.2017:- एखाद्या गुन्ह्यातील आरोपीस न्यायालयाकडून जोपर्यंत शिक्षा सुणावली जात नाही तोपर्यंत त्या गुन्ह्यातील पिडीतांस न्याय मिळत नाही. गुन्हे शाबितीचे महाराष्ट्रातील प्रमाण पाहता पोलिसांसाठी हा एक संशोधनाचा व अभ्यासाचा विषय आहे. औरंगाबाद शहर पोलिसांनी गुन्हे शाबिती हे एक आव्हान म्हणून स्वीकारले आहे. त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणून मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी औरंगाबाद पोलीस आयुक्तालयाचे गुन्हे शाबितीच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे.

**पोलीस महासंचालक श्री सतीशचंद्र माथुर** यांनी सातत्याने गुन्हे शाबितीचे प्रमाण वाढविण्यासाठी अत्यंत मौलिक सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये 1. फॉरेन्सिक (न्यायवद्यक) पद्धतीने पुरावे संकलित करणे. 2. साक्षीदारांच्या जवाबाचे व्हिडीओ

चित्रीकरण व  CCTV कॅमेऱ्याचे चित्रीकरणाचा पुरावा म्हणून कोर्टात वापर करणे ज्यामुळे एखादेवेळेस साक्षीदार जरी फितूर झाला तरी या व्हिडिओ चित्रीकरणाच्या मदतीने गुन्हे शाबिती करण्यास मदत होईल.  3. साक्षीदारांचे 164 सी. आर. पी. सी. नुसार जवाब नोंदविणे 4. संनियंत्रण समितीच्या मार्फतीने सर्व पुराव्यांची पडताळणी करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर करणे या महत्वाच्या सूचना आहेत. मा. पोलीस महासंचालक यांचे सूचनेनुसार पोलीस आयुक्त श्री यशस्वी यादव  यांनी औरंगाबाद पोलीस आयुक्तालयाचा पदभार घेतल्यापासून  गुन्हे शाबितीचे  प्रमाण वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यास सुरुवात केली. त्यानुसार विशेष लक्ष देऊन दर पंधरा दिवसांनी स्वतः पोलीस आयुक्त यशस्वी यादव आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय) डॉ. दिपाली धाटे -घाडगे व सहाय्यक पोलीस आयुक्त रामेश्वर थोरात हे सर्व पो.स्टे पैरवी अधिकारी यांची बैठक घेऊन  त्यांना गुन्हे शाबितीच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी मार्गदर्शन करतात. तसेच एखादा गुन्हा हा कोर्टात सुटल्यानंतर त्याच्या निकाल पत्राच्या आधारे तो गुन्हा कोणत्या कारणांमुळे सुटला आहे, त्या बाबींवर परामर्श करून अशा प्रकारच्या उणीवा पुन्हा राहणार नाही याकरिता तपासी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातात. प्रत्येक बैठकीमध्ये चालू असलेल्या खटल्यातील त्रुटींवर लक्ष देऊन भविष्यात अशा त्रुटींची पूर्तता करून भक्कम पुरावा तयार करून कोर्टात दोषारोप पाठविणे बाबत मार्गदर्शन केले जाते. समन्स ,वॉरंट वेळीच तामील करण्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा केला जात आहे.

गुन्हे शाबितीचे प्रमाण वाढविण्याकरिता प्रत्येक पोलीस स्टेशन मधून एक पो.उप.नि दर्जाचा अधिकारी पैरवी अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. पैरवी अधिकारी खटल्याच्या वेळी न्यायालयातील दैनंदिन चालणाऱ्या कोर्ट केसेसचा रोज आढावा घेत असतात. गुन्हे दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयात मुख्य पैरवी कक्ष स्थापन करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपाली निकम (भामरे) यांची नेमणूक करण्यात आली आहे. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे उपयुक्त न्यायनिवाडे खटला चालू असताना पैरवी अधिकारी हे सरकारी अभियोक्ता यांची मार्फतीने न्यायालयात सादर करतात. तसेच गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल झाल्यावर तज्ञांचे अभिप्राय प्राप्त नसल्यास त्यांचा पाठपुरावा करून ते अभिप्राय वेळीच पैरवी अधिकारी दाखल करतात. या सर्व उपाययोजनांमुळे गुन्हे शाबितीच्या प्रमाणात लक्षणिय वाढ झाली आहे.

मागील वर्षी सन 2016 ऑगस्ट अखेर भा.द.वि. खालील गुन्हे शाबितीचे प्रमाण पाहता सन 2016 ऑगस्ट अखेर शिक्षेचे प्रमाण 27% होते. त्या तुलनेत चालू वर्षी ऑगस्ट 2017 अखेर हेच प्रमाण 43% आहे. म्हणजेच  मागील वर्षीच्या तुलनेत गुन्हे

शाबितीच्या प्रमाणात 16% वाढ झाली आहे. तसेच विशेष कायद्याखाली सन 2016 ऑगस्ट अखेर शिक्षेचे प्रमाण 12% होते. विशेष कायद्याखालील खटल्यामध्ये चालू वर्षी ऑगस्ट 2017 अखेर हेच प्रमाण 16% आहे. म्हणजेच मागील वर्षीच्या तुलनेत गुन्हे शाबितीच्या प्रमाणात 4% वाढ झालेली आहे. एकंदरीत सन 2016 ऑगस्ट अखेर भा.द.वि व विशेष कायद्या प्रमाणे असे एकूण शिक्षेचे प्रमाण 24% होते त्याप्रमाणात चालू वर्षी ऑगस्ट 2017 अखेरीस 38% झाले आहे म्हणजेच मागील वर्षीच्या तुलनेत 14% वाढ झाली आहे.

वरील सर्व उपाययोजनांसह आता प्रादेशिक न्याय्साहाय्यक वज्ञानिक प्रयोगशाळा औरंगाबाद येथे DNA फिंगरप्रिंटींग सुविधा उपलब्ध झाली असून त्याचा गुन्हे शाबितीचे प्रमाण वृद्धीस फायदा होणार आहे. येणाऱ्या काळात औरंगाबाद शहर पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाबितीच्या प्रमाणात आणखी वाढ होणार आहे असा विश्वास पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी व्यक्त केला आहे.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 07/09/2017

प्रेस नोट

## गुन्हे शाखेने बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्यास केले जेरबंद.

दि.08.09.2017:- गुन्हे शाखेने खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीवरून गजानन महाराज मंदिर ते जयभवानी नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील शलेश बार जवळ एक इसम प्लास्टिकच्या पिशवीत देशी दारूच्या बाटल्या विक्री करतांना मिळून आल्याने त्यास पकडून त्याच्याकडून 1,040/- रु. किंमतीच्या 20 देशी दारूच्या बाटल्या जागीच जप्त केल्या. सचिन भगवानराव धुमाळ रा.24 वर्ष, रा. मुकुंदवाडी असे आरोपीचे नाव आहे. गुन्हे शाखेकडून अधिक माहिती मिळाली कि पोलीस उप निरीक्षक अनिल वाघ व स्टाफ हे पोलीस आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस हवालदार मोरे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि गजानन महाराज मंदिर ते जयभवानी नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील शलेश बार जवळ एक इसम प्लास्टिकच्या पिशवीत देशी दारूच्या बाटल्यांची चोरटी विक्री करीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून गुन्हे शाखेचे पो.उप.नि. अनिल वाघ व त्यांच्या पथकाने त्याठिकाणी छापा मारून आरोपी नामे सचिन भगवानराव धुमाळ यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून 20 देशी दारूच्या बाटल्या किंमत 1,040/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पोकॉ. संतोष सूर्यवंशी यांनी सरकार तर्फे फिर्याद देऊन नमूद आरोपीविरुद्ध मुकुंदवाडी पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम 65 (ख) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मधुकर सावंत पो.उप.नि अनिल वाघ, पोलीस हवालदार नितीन मोरे, पोना. भगवान शिलोटे, मनोज चव्हाण, पोकॉ. संजय खोसरे, अय्युब पठाण, शेख हकीम यांनी केली.

**पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर**
डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 07/09/2017

<u>प्रेस नोट</u>

## पोलीस उपायुक्त (मुख्यालय) डॉ. दिपाली धाटे-घाडगे यांनी घेतली महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची बैठक.

दि. 08.09.2017:- आज रोजी पोलीस मुख्यालय येथे डॉ दिपाली धाटे- घाडगे पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांनी पोलीस आयुक्तालयातील सर्व महिला कर्मचारी व दि. 07.09.2017 रोजी महिला पोलीस अधिकारी यांच्या अडी-अडचणी जाणून घेण्यासाठी बठक आयोजित केली होती. या बठकीस महिला तक्रार निवारण कक्षाच्या पो.नि. किरण पाटील या उपस्थित होत्या. या बठकीमध्ये महिला पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना येणाऱ्या अडचणी या बठकीत मांडल्या. पोलीस उपायुक्त मुख्यालय यांनी त्या तक्रारींचे निवारण करण्याचे आदेश दिले. तसेच पोलीस उपायुक्त मुख्यालय यांनी महिला अत्याचार वरील गुन्हे याबाबत काय दक्षता घ्यावी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या बठकीस पोलीस आयुक्तालयातील 24 महिला पोलीस अधिकारी व 170 महिला पोलीस कर्मचारी उपस्थित होत्या.

**स्वाक्षरीत/-**

(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर